**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २४० / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.प्रभाकर पंजाबराव शेंडे,
मु.पो. नांदगांव पेठ,
ता.जि. अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय,
अमरावती, ता.जि.अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार, सं.गा.यो.
तहसिलदार, तहसिल कार्यालय,
अमरावती, ता.जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, अमरावती श्री.पी.एन. ठाकरे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अमरावती श्री.पी.एस. घोरमाडे हे हजर आहेत.

अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करण्याचे कारण माहिती अपुर्ण दिल्याबद्दल म्हटले आहे. अर्जदाराला दि.०५/१२/२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अमरावती यांनी माहिती पुरविली आहे परंतु माहिती मिळाली असतांना माहिती अर्धवट मिळाली असे अर्जदाराने लिहुन दिले. आज रोजी अर्जदार गैरहजर असल्यामुळे कुठली माहिती अपुर्ण आहे या गोष्टीची शहानिशा होवुन शकली नाही. तरी अर्जदाराने जी माहिती मिळाली नाही त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे लेखी दिल्यास जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसात अर्जदारास माहिती पुरवावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २४१ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.विजय मुरलीधर अन्वेकर,
रा.औरंगपुरा, जोडमोट, अमरावती
ता.जि.अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मा.पोलीस उपायुक्त (परीमंडळ),
पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर
ता.जि. अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
मा.सहायक पोलीस आयुक्त,
सहायक पोलीस आयुक्त कार्यालय,
राजापेठ, विभाग, अमरावती
ता.जि. अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग, अमरावती श्री.एस.टी. महाजन हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर दिनांक २९/११/२०१० रोजी असे लेखी दिले की, सदर प्रकरणात दिनांक ०१/०२/२०१० रोजी दाखल केलेले अपिल खारीज करण्यात यावे.

अर्जदाराने केलेली विनंती मान्य करण्यात येवुन अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २४२ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.महादेव किसनराव निमकर,
रा.शिवाजी चौक, दारव्हा,
ता.दारव्हा, यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, बुलडाणा,
ता.जि. बुलडाणा.

२. जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, बुलडाणा,
ता.जि. बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.महादेव किसनराव निमकर हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा श्री.एस.ए. सोनुने हे हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक ३०/०४/२००९ रोजी माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा (माध्य.) शिक्षण विभाग यांचेकडे अर्ज करुन दिनांक ०१/०७/६९ ते ३१/०३/२००९ पर्यंत शिक्षणाधिकारी या पदावर ज्यांनी सेवा केली त्यांचे संपुर्ण नांव, सेवेचा कालावधी, सेवेत असल्यास संबंधित कार्यालयातील पद व पत्ता याबाबत माहिती मागितली. ती माहिती दिनांक २२/०५/२००९ रोजी पुरविण्यात आली. तरी सुध्दा अर्जदाराने हया आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल केले. शिक्षणाधिकारी यांचे खुलाशाची प्रत या आयोगास सादर करण्यात आली. अर्जदाराला खुलाशाची प्रत व माहिती देण्यात आली.

अर्जदाराचे म्हणण्यानुसार आजपर्यंत माहिती मिळाली नाही, तरी सदरची माहिती अर्जदाराला हया आयोगासमोर पुरविण्यात आली. माहिती पुरविण्यात आल्यामुळे अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २४३ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.मधुकर पुंडलिकराव काळमेघ,
ह.मु. राजमंगल गृहनिर्माण संस्था,
व्हि.एम.व्हि.रोड, अमरावती
ता.जि. अमरावती.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, मोर्शी
ता.मोर्शी, जि.अमरावती
२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, शिरजगांव (भि)
ता.मोशी, जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती, मोर्शी श्री.एस.ई. जोल्हे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन सचिव, ग्रामपंचायत शिरजगांव (भि) श्री.पि.पी. आवारे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा (सध्या कार्यरत असलेले) सचिव, ग्रामपंचायत शिरजगांव (भि) श्री.आर.यु. अंबाडकर हे हजर आहेत.

अर्जदाराने सचिव ग्रामपंचायत, शिरजगांव यांचेकडे दिनांक ०७/०७/२००८ ला माहितीच्या अधिकारात अर्ज केला व ग्रामपंचायत संबंधी ७ मुद्दयांची माहिती मागितली. माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. त्यात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना ७ दिवसात माहिती पुरवावी असे कळविले तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती घेवुन जावी व अर्जावर १० रु. चा स्टॅम्प न लावण्याबाबत सुचित केले त्यानंतरही अर्जदार हजर झाले नाही. अर्जदाराला पुरवावयाची माहिती ३-४ पेजेसची असल्यामुळे ती माहिती अर्जदाराला पोष्टाने विनाशुल्क पुरविण्यात यावी. अर्जदार गैरहजर असल्यामुळे अर्जदाराने स्टॅम्प का लावला नाही याबाबतची शहानिशा होवु शकली नाही.

वरील बाबी लक्षात घेवुन अर्जदाराचे अपिल निकाली काढण्यात येते.

अर्जदार अपिलार्थी हे उशिरा हजर झाले व त्यांना दिलेल्या आदेशाबाबत अवगत करण्यात आले. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत, शिरजगांव (भि) श्री.पि.पी. आवारे यांच्याविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी माहिती न दिल्यामुळे कारवाई सुध्दा केलेली आहे असे सांगितले.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २४४ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.मधुकर तुकारामजी उजगांवकर,
व्दारा संजय अनासाने ७ ब, गोकुळ कॉलनी,
एकविरा नगर, अमरावती, ता.जि.अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कृषी उत्पन्न बाजार समिती, धामणगांव रेल्वे,
ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
कृषी उत्पन्न बाजार समिती, धामणगांव रेल्वे,
ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.मधुकर तुकारामजी उजगांवकर हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, धामणगांव रेल्वे श्री.अरुण वि.लोहे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने प्रपत्र ‘अ’ दिनांक २५/०५/०९ नुसार माहिती मागितली. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार दिनांक २०/१०/२००९ ला माहिती पुरविण्यात आली. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदरची माहिती अपुर्ण आहे व मुद्दा क्रमांक ९ बाबत निरीक्षण देण्यात आले नाही ते निरीक्षण अर्जदारास आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने प्रपत्र ‘ब’ नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २३/११/२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्याची सुनावणी घेण्यात आली नाही व त्यामुळे आदेश पारीत करण्यात आला नाही. उत्तरवादी यांचे म्हणण्यानुसार या आयोगाने खामगांव कृषी उत्पन्न बाजार समितीबाबत असा निर्णय घेतला की, या संस्थेस माहितीचा अधिकार लागु होत नाही. परंतु याच आयोगाने उच्च न्यायालयाचा निवाडा नंतर असा निर्णय दिला की, जी संस्था कायदयाने १९६३ साली स्थापन झाली त्या संस्थेला माहिती अधिकार लागु होतो. महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार खरेदी विक्री (विकास व विनियमन) १९६३ च्या अधिनियमानुसार सदरची संस्था ही अस्तित्वात असल्याने सदर संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम लागु होतो. म्हणुन या बाबी लक्षात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्याचे कबुल केले व तसेच मुद्दा क्रमांक ९ नुसार अर्जदारास निरीक्षण देण्याचे सुध्दा कबुल केले. त्यानुसार दिनांक ०७/१२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता प्रथम अपिलिय अधिका-याकडे सदर प्रकरणात सुनावणी ठेवण्यात येईल व अर्जदाराला मागितलेले निरीक्षण देण्यात येईल व त्या अनुषंगाने जी माहिती मागितली ती पुरविण्यात येईल व त्यासाठी अर्जदाराकडुन योग्य त्या खर्चाचा भरणा करुन माहिती पुरवावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास ९० दिवसात हया आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल करता येईल.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २४५ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.अशोक गोविंदराव इंगळे,
संपादक साप्ता.योग दर्पन,
मेन रोड, मंगरुळपीर, जि.वाशिम.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मंगरुळपीर
ता.मंगरुळपीर, जि.वाशिम.
२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, पिंपळगांव,
ता.मंगरुळपीर, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे विस्तार अधिकारी (सांख्यिकी), पंचायत समिती, मंगरुळपीर श्री.ए.बी. येवतेकर हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत पिंपळगांव, श्री.आर.पी. तायडे हे हजर आहेत.

अर्जदाराला दिनांक ०२/०३/२०१० रोजी माहिती देवुन अर्जदाराची पोच घेण्यात आली. सदरची पोच १. श्री.बबन भगत २.श्री.हरिश्चंद्र राठोड या दोन साक्षीदारांसमोर घेण्यात आली व त्यात अर्जदाराने सर्व माहिती मुद्दे निहाय प्राप्त झाली व काहीही तक्रार राहीली नाही असे लिहुन दिले. अर्जदाराने या आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल केले व त्यानंतर अर्जदाराला जवळपास १ महिन्यानंतर माहिती पुरविण्यात आली. अर्जदाराला माहिती मिळाल्यामुळे अर्जदार गैरहजर राहिले असावे, असा निष्कर्ष काढण्यात येते व सदरचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २४६ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.अशोक गोविंदराव इंगळे,
संपादक साप्ता.योग दर्पन,
मेन रोड, मंगरुळपीर, जि.वाशिम.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पंचायत समिती, मंगरुळपीर
ता.मंगरुळपीर, जि.वाशिम.

२. जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा,
आसेगांव, ता.मंगरुळपीर, वाशिम

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे वरिष्ठ लेखा सहाय्यक, पंचायत समिती, मंगरुळपीर श्री.ए.एस. होनमणे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, आसेगांव श्री.पुंडलिक वाघजी शेळके हे हजर आहेत.

अर्जदाराने मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, आसेगांव, पंचायत समिती मंगरुळपीर यांचे कडुन माहिती मागितली. सदर माहिती अर्जदाराने टपालाने मागितलेली आहे. सदरची माहिती अर्जदाराला पुरविण्याचे बरेच प्रयत्न केले परंतु अर्जदाराने पुढल्या वेळेला येतो व माहिती घेवुन जातो असे म्हटले व ते आलेले नसल्यामुळे सदरची माहिती दिनांक ०३/०२/२०१० रोजी गटशिक्षणाधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात आली. अर्जदाराने याबाबत माहिती संबंधिताकडुन घेतली किंवा नाही याबाबत गटशिक्षणाधिकारी यांना कुठलीच माहिती नाही. अर्जदार गैरहजर असल्यामुळे अर्जदाराला माहितीची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष काढण्यात येऊन सदरचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २४८ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.कमलपुत्र निरंजन शिरसाट,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,
एम.आय.डी.सी. रोड, शिवणी,
ता.जि.अकोला.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),
जिल्हा परिषद, अकोला.
**२**. जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, अकोला.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे उशीरा हजर झाले आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, सामान्य प्रशासन, जिल्हा परिषद, अकोला श्री.जे.डी. डोंगरे हे हजर आहेत.

अर्जदाराने प्रपत्र 'अ' नुसार दिनांक ०३/११/२००९ रोजी माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभाग, अकोला यांचेकडे अर्ज करुन कलम ४ (१) नुसार १७ मुद्दयाची माहिती मागितली व ती प्रसिध्द केली किंवा नाही याबद्दलची सुध्दा माहिती मागितली. सदरची माहिती व्यक्तीशः मागितली. सदरची माहिती दिनांक २४/११/२००९ ला देण्यात आली तरी सुध्दा अर्जदाराने प्रपत्र 'ब' दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवुन आदेश दिला व त्यात मुद्दा क्रमांक १ ची माहिती वेब साईटवर टाकण्यात यावी व सदरची कार्यवाही ७ दिवसात करण्यात यावी. त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्यास ९० दिवसांचे आंत अपिल करावे असे म्हटले आहे. त्यानुसार दिनांक ०३/०२/२०१० ला व्दितीय अपिल दाखल करण्यात आले. जन माहिती अधिकारी श्री.डोंगरे हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार माहिती वेब साईटवर टाकली व तसे कळविण्यात येवुन अर्जदाराला त्याची प्रत देण्यात आली. त्यामुळे अर्जदार गैरहजर राहीले असावे असा निष्कर्ष काढण्यात येतो परंतु दिलेली माहीती अपुर्ण कशी आहे याबाबत अर्जदार गैरहजर असल्यामुळे शहानिशा होवु शकली नाही. अर्जदाराला कलम ४ ची माहिती पाहिजे ती पुरविण्यात आली. त्यामुळे अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

अर्जदार अपिलार्थी हे उशिरा हजर झाले व त्यांना झालेल्या आदेशाबाबत अवगत करण्यात आले. तसेच त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार माहिती दिलेली नाही असे सांगितले. तरी संबंधित माहिती ही अर्जदारास रजिष्टर पोष्टाने आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसाचे आंत अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पाठवावी. तसेच अर्जदाराचा मुद्दा क्रमांक २ नुसार अर्जदाराने अशी माहिती मागितली आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला त्यांच्या निवासस्थानावर कार्यरत असलेले कर्मचा-याबाबत लेखी स्वरुपात माहिती उपलब्ध असल्यास तसे कळवावे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार श्री.गजानन शिंदे आणि श्री.शामराव पाटील हे २ कर्मचारी त्यांच्या निवासस्थानावर काम करीत आहे. तरी सदर कर्मचा-याचे वेतन ज्या आदेशाव्दारे देण्यात आले त्या आदेशाची प्रत देण्यात यावी असे म्हटले आहे. तरी, मुख्य कार्यकारी अधिकारी

यांच्या आदेशानुसार नेमणुक झाली आहे किंवा त्यांचे पगार जिल्हा परिषद मार्फत होते याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा देण्यात यावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अकोला.

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २५० / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.प्रविण लक्ष्मणराव ठाकरे,
मु.पो. घोराड, ता.खामगांव,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
बुलडाणा, ता.जि. बुलडाणा.
**२**. जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक,
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे कार्यालय,
बुलडाणा, ता.जि. बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बुलडाणा श्री.पी.के. लहाने हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय, बुलडाणा श्री.डी.एन. नेवारे हे हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक ०१/०२/२०१० रोजी व्दितीय अपिल दाखल केले व त्यामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे दाखल अपिलावर कुठलीही कार्यवाही केलेली नाही असे म्हटले आहे. तांत्रिक दृष्टया प्रथम अपिलात निकाल दिल्याशिवाय व्दितीय अपिल चालत नाही. तसेच अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बुलडाणा हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक श्री.वसावे यांचेकडे माहिती पुरविण्याबाबत पदभार दिलेला आहे परंतु त्यांचा पदभार व्यवस्थित करीत नाही त्यामुळे अर्जदाराला माहिती पुरविण्यासाठी अडचण येत आहे व त्यामुळे त्यांचेवर कारवाई प्रस्तावित आहे. अर्जदाराच्या प्रथम अपिलावर ४ आठवडयाच्या आंत सुनावणी घेवुन व तशा प्रकारची आगावु नोटीस अर्जदारास दयावी. जन माहिती अधिकारी व अर्जदार यांचे म्हणणे ऐकुन योग्य तो आदेश पारित करण्यात यावा. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर अर्जदाराला माहिती न पुरविल्याबाबत किंवा कलम ७ (१) नुसार अर्ज निकाली काढला नाही याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांची चौकशी करावी व ते दोषी आढळल्यास त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार व्दितीय अपिल ९० दिवसांत या आयोगासमोर दाखल करु शकतात.

खालील आदेश पारीत करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी अर्जदाराच्या प्रथम अपिल प्रपत्र 'ब' नुसार आजपासुन ४ आठवडयाच्या आंत सुनावणी घेवुन जन माहिती अधिकारी व अर्जदार यांचे म्हणणे ऐकुन योग्य तो आदेश पारित करावा व माहिती देण्याचे दृष्टिने जन माहिती अधिकारी यांना आदेश दयावा व माहिती दिली गेली नसल्यास संबंधितावर कारवाईबाबत आक्षेप नोंदवावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १५९ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.मौलाना अयुब खान अहेमद खान,
वार्ड क्र.७, ताजनगर, पारपेठ,
मु.ता.मलकापुर, जि.बुलडाणा.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा,
जि.बुलडाणा.

२.जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, अल्ली अल्लाना उर्दु हायस्कुल गुरूव्दारा जवळ,
गणवाडी रोड, मलकापुर, जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ३०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे श्री.मौलाना अयुब खान अहेमद खान हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग (माध्य.) जि.प. बुलडाणा श्री.एस.ए. सोनुने हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अल्ली अल्लाना उर्दु हायस्कुल, मलकापुर श्री. फिरोज खॉ. गौस खॉ हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे ॲड.श्री.राजेंद्र पांडे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात मागील तारीख दिनांक १५/११/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती व सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी हे हजर नव्हते व ते आजारी असल्यामुळे त्यांना आजची म्हणजे दि.३०/११/२०१० ही पुढिल सुनावणीची तारीख देण्यात आली होती व त्याकरिता ते अर्जदारास ५००/- रु. नुकसान भरपाई देण्यास तयार होते. त्यासाठी सदर प्रकरणात अर्जदाराला हया आयोगासमोर ५००/- रु. देण्यात आले तसेच सदर प्रकरणात अर्जदाराला माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याचे कबुल केले व त्यासाठी दिनांक १३/१२/२०१० रोजी ११.०० वाजता उपलब्ध माहिती घेवुन मुळ अभिलेखासह हजर राहतील व अर्जदाराला जी माहिती पाहिजे त्या माहितीची झेरॉक्सच्या प्रमाणित प्रती करुन त्याकरिता रु. २ प्रती प्रमाणे अर्जदार भरणा करतील व त्याच दिवशी उत्तरवादी हे अर्जदाराकडुन माहिती दिल्याबद्दलची पोच घेतील. ही सर्व प्रक्रिया श्री.एस.ए. सोनुने, कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे समक्ष करण्यात यावी. त्यानंतरही अर्जदाराला काही तक्रार असल्यास कलम १८ खाली या आयोगाकडे तक्रार अर्ज करता येईल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी हया आयोगासमोर दाखल केलेल्या वैद्यकिय प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत अर्जदाराला या आयोगासमोर देण्यात आली.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**